# नाद

नाद म्हणजे sound, ध्वनी. पण हा झाला शब्दशः अर्थ. प्रत्येक नाद हा ध्वनी असतो पण प्रत्येक ध्वनी 'नाद' नसतो.

ध्वनी प्रामुख्याने दोन प्रकारचे, कर्ण कठोर अर्थात non musical sound आणि कर्णमधुर, जे ऐकायला छान वाटते म्हणजे musical sound.

वस्तूंच्या आघाताने ध्वनी लहरी कंपने पावतात आणि त्या एखाद्या  माध्यमाद्वारे प्रसारित होतात त्यावेळी 'नाद' निर्मिती होते. एखाद्या धातूच्या भांड्याला एखादी वस्तू आदळली तर एक दीर्घ काळ टिकणार ध्वनी निर्माण होतो, तो हा नाद.

नाद हा मंदिरातील घंटेच्या आवाजाने निर्माण होतो तसाच टाळ वाजताना निर्माण होतो. मृदुंगावर पडलेल्या थापेमुळे नाद निर्मिती होते तशीच शंखध्वनीमुळे होते. तंबोऱ्याच्या तारांच्या कंपनामुळे होते तशीच वेणूच्या सुमधुर ध्वनी लहरीमुळे नाद निर्माण होतो.

कर्णमधुर ध्वनी अर्थात नाद आणि संगीताचा खूप जवळचा संबंध आहे. ह्याच सांगीतिक भाषेत बोलायचे तर, नाद दोन प्रकारचे असतात. आहद नाद आणि अनाहद नाद.

आहद नाद हा प्रत्यक्षरित्या कानाद्वारे ऐकू शकतो. जसे टाळ वाजताना निर्माण होणारा नाद, घुंगरांचा मंजुळ नाद, वेणूचा सुमधुर नाद, मृदुंगावर थाप  पडल्याने उमटलेला नाद. अश्या आहद नादामुळे संगीताची निर्मिती होते.

'स्थिर व नियमित ध्वनीच्या आंदोलनाद्वारे  हा आहद नाद निर्माण होतो. हा नाद ढोल वाजवताना प्रत्येक आघातातून निर्माण होतो. नाद हा तालबद्ध , कंपनीय ध्वनी असतो जो तंतुवाद्यांच्या कंपनाने निर्माण होतो.

नाद हा विविध वाद्यांमुळे निर्माण होतो तसा तो निसर्गात सुद्धा अनुभवता येतो. वसंत ऋतूत कोकीळ कुंजनाने जणू नाद निर्मिती होते तशीच समुद्राच्या लाटांच्या तालबद्ध ध्वनीत ऐकू येते. बैलगाडीला जुंपलेल्या बैलजोडीच्या गळ्यातील घुंगरांच्या आणि चाकाला लावलेल्या घुंगरांच्या तालबद्ध आवाजाने नाद निर्मिती होते तशीच बांबूच्या वनात वाहणाऱ्या वाऱ्यामुळे मधुर नादाची

निर्मिती होते. डेरेदार पिंपळाच्या पानातून सळसळ वाहणाऱ्या वाऱ्यामुळे गूढ नाद निर्माण होतो तसाच रेलगाडी रुळावर धावताना रुळाच्या सांध्यांवर, चाक जाताना लयबद्ध ध्वनी, नादाची निर्मिती होते.

आहद नाद जसा कानाने ऐकू शकतो तसा अनाहद नाद कानाने ऐकू शकत नाही. अनाहद नाद हा फक्त अनुभवू शकतो.

भारतीय प्राचीन योगशास्त्रानुसार जे अष्टांग योग विशद केले आहेत त्यापैकी प्राणायाम आणि ध्यान यांचे खूप मोठे महत्त्व आहे. शरीर स्थिर ठेवत मनावर ताबा मिळवताना, मनातील विचार शांत करत एक स्थिरता सध्या करताना साधक जणू शून्यावस्थेत पोहोचतात. ह्या ध्यानस्थ अवस्थेत जणू त्याचे लक्ष फक्त श्वासांवर केंद्रित झालेले असते. अश्या ध्यानस्थ अवस्थेत जणू श्वासाच्या कंपनाचा ध्वनि ऐकत असल्याचा अनुभव मिळतो, तोच जणू 'अनाहद नाद' होय. संत महात्मे आणि साधक आपल्या तपश्चर्येने आणि साधनेने अनाहत नादाचा अनुभव घेतात. हा अनाहद नाद जणू अंतर्मनात उमटत असतो.

'ओम'   हा फक्त दीड अक्षरी शब्द नसून 'अ', ' उ' आणि 'म्' ह्या तीन अक्षरांचा एक लयबद्ध उच्चार आहे. त्या लयबद्ध उच्चाराने जणू नाद निर्मिती होते. या आपल्या श्वासाच्या लयीचा एक तालबद्ध नाद आहे. हा नाद जणू अनाहद नाद असून तो ध्यानात अनुभवता येतो.

अनाहद नाद शांत आणि एकाग्र मानसिक अवस्थेत अनुभवता येतो. संगीतकार एखाद्या संगीताची निर्मिती करण्याआधी जो नाद अनुभवतो तो अनाहद नाद. ज्या असामान्य प्रतिभेतून आणि प्रेरणेतून उत्तम संगीताची निर्मिती होते, तो नाद तो संगीतकार प्रथम अनुभवतो तोच हा अनाहद नाद. पं हृदयनाथ मंगेशकर ह्यांनी त्यांच्या 'भावसरगम' कार्यक्रमात सांगितलेला किस्सा आहे. 'मी डोलकर, डोलकर, डोलकर दर्याचा राजा' ह्या गीताच्या निर्मितीचा किस्सा आहे तो. बंगाली कामावर, खारवा मोठे पाईप ढकलताना, लाकडाचा आधार घेत एकसुरात आरोळी देत सामुहिक बळ लावतात, त्यावेळी तो तालबद्ध 'हो s हो s' अशी आरोळी देतात त्या नादाचा उपयोग, 'वहलव रे नाखवा हो' ह्या स्वरनिर्मितीत केला होता. अश्याप्रकारे हा अनाहद नाद या महान संगीतकाराने जणू प्रथम अनुभवला. 'नया दौर' चित्रपटातील 'मांगके साथ तुम्हारा' ह्या गाण्यातील घोड्यांच्या टापांचा आणि टांग्याचा लयबद्ध नाद, असाच अनाहद नाद, जो संगीतकाराने प्रथम अनुभवला असणार. आर. डी. बर्मनने 'किताब' चित्रपटातील 'धंनू की आंखों में' गाण्यातील वाफेच्या इंजिनावरील रेल्वेचा लयबद्ध नाद, अनाहद नादाच्या रुपात नक्कीच अनुभवला असणार. हाच अनाहद नाद, जो प्रतिभावान लोक अनुभवतात आणि त्यातून असामान्य संगीताची नवनिर्मिती होते.

नाद निर्मिती होते आणि तो मधुर नाद आपण अनुभवतो त्यावेळी मन प्रसन्न आणि एकाग्र होते. ह्या कंपनीय मधुर ध्वनीचा उपयोग मन आणि चित्त एकाग्र करण्यासाठी होतो. तिबेट संस्कृतीत ध्यान करताना, 'sounding bowl' चा वापर करतात. एका विशिष्ट धातूच्या भांड्यावर लाकडाचे आघात केल्यानंतर, तेच लाकूड त्या भांड्याभोवती फिरवताना ध्वनि कंपने निर्माण होतात व ती दीर्घकाळ टिकतात. त्यातून जणू मधुर ध्वनीची निर्मिती होते, ते ऐकताना मन आणि चित्त एकाग्र होते.

नाद आणि एकाग्रता, तल्लीनता ह्याचा खूप जवळचा संबंध आहे. विठुरायाचे भक्त अभंग गाताना एकतारी अथवा तंबोरा ह्याचा वापर करतात. ह्या नादमय ध्वनिमुळे मन आणि चित्त एकाग्र होऊन ईश्वर चरणी विलीन होते.

नाद जसे मन एकाग्र करतो तसेच मन प्रसन्नही करतो. आरतीच्या वेळी टाळ, मृदुंग ह्यांच्या गजरात नादमय ध्वनीची निर्मिती होत भक्तिमय वातावरण तयार होते आणि तल्लीनतेने ईश्वराची आराधना होते.

'नाद' हा ध्वनि कंपनाच्या निर्मितीतून उमटलेला मधुर ध्वनि, स्वर आहे परंतु त्या नादाचा आहद अथवा अनाहद नादाच्या रुपात, परीणाम खूप व्यापक आहे. एका नादातून नव्या नादाची निर्मिती होत असते. जणू नादातून नाद निर्माण होतो, जणू एक ईश्वरीय साक्षात्कार अनुभवता येतो. अश्यावेळी पं. शौनक अभिषेकीच्या रामधुनीच्या ओळी आठवतात.
"नादातून या नाद निर्मिती,
श्रीराम जय राम जय जय राम."

**-मनोज कुरुंभटी**